महाराष्ट्र शासन

# शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य
मध्यवर्ती इमारत, ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१

w'site : education.maharashtra.gov.in
e-mail : doehighersec@gmail.com
Phone : (020) 2612 1396 / 6463

जा.क्र. उच्च माध्य-२४३/मुल्यांकन/२०१८/1040
दिनांक : १२.११.२०१८

12 NOV 2018

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व विभाग
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
सर्व जिल्हे

विषय:- उच्च माध्यमिक शाळा मुल्यांकन २०१४-१५.
**कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या उच्च माध्यमिक शाळा तसेच उच्च माध्यमिक शाळेच्या वर्ग / तुकडया अनुदानाबाबातचे प्रस्ताव स्वीकारणेबाबत.**

संदर्भ:- १) मा. आयुक्त (शिक्षण) यांचे पत्र क्रमांक उच्च माध्य.२४३/मुल्यांकन/१४-१५/२०१८/३४४३ दिनांक ३० जून, २०१८.
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक उच्च माध्य/२४३/मुल्यांकन/२०१८/५०११ दिनांक २४.०७.२०१८.
३) संचालनालयाचे पत्र क्रमांक उच्च माध्य/२४३/मुल्यांकन/२०१८/७४२९ दिनांक १८.०८.२०१८.

----

उपरोक्त विषयाचे संदर्भात दिनांक २४.०७.२०१८ रोजी सर्व सहा. शिक्षण संचालक व सहा. शिक्षण उपनिरिक्षक यांची सभा घेऊन मा. आयुक्त (शिक्षण) यांचे सुचनेप्रमाणे विहित मुदतीत प्रस्ताव स्विकारणे व ते या कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देष देण्यात आलेले होते त्यानुसार आपल्या कार्यालयाकडुन प्रस्तावही सादर करण्यात आलेले आहेत. पुणे विभागानी या कार्यालयास हार्डकॉपी अद्यापही सादर केलेली नाही.

संचालनालयाचे उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ चे पत्रान्वये जिल्हा व विभागीय स्तरावर सन २०१४-१५ यमध्ये मुल्यांकर केलेले प्रस्ताव स्वीकारुन ते सादर करण्याच्या सुचनासुध्दा देण्यात आल्या होत्या परंतु तरीही अनेक जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षण उपसंचालक स्तरावर प्रस्ताव स्वीकारण्यात आले नसल्याच्या तक्रारी संचालनालयाकडे प्राप्त होत आहे.

सन २०१४-१५ मध्ये मुल्यांकन झालेल्या सर्व प्रस्ताव सादर होणे अपेक्षित आहे कोणीही यापासुन वंचित राहणार नाही याची आपल्या स्तरावर दक्षता घेण्यात यावी. याबाबत वेळोवेळी योग्य त्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ चे पत्रान्वये दिलेल्या वेळापत्रकानुसार विभागाकडुन संचालनालयास प्रस्ताव सादर केल्यानंतर जिल्हा स्तरावर न स्वीकारले किंवा संस्थांना याची कल्पना नसल्यामुळे विहित मुदतीत सादर न होऊ शकलेले किंवा आपल्या स्तरावर प्रलंबित असलेले प्रस्ताव एकत्रित दिनांक २६.११.२०१८ पर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे सादर करुन विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी एकत्रित प्रस्ताव दिनांक ३०.११.२०१८ पर्यंत संचालनालयास कोणत्याही परिस्थितीत सादर करण्यात याव्यात. यानंतर कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही व याची सर्व जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व सबंधित उपसंचालक यांची राहील.

याबाबत जिल्हयातील उच्च माध्यमिक / क.म.वि. / संस्थाचालक यांना आपल्या स्तरावरुन अवगत करावे व त्यांनी सादर केलेले त्रूटीपूर्तता व नवीन प्रस्ताव स्वीकारण्यात यावे. प्रस्तावांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

याउपरही जिल्हा स्तरावर / विभागीय स्तरावर प्रस्ताव स्वीकारले नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची गंभिर दखल घेऊन सबंधितांवर योग्य कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(गंगाधर म्हमाणे)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्चमाध्यमिक)

25927-31

जा.क्र.उमा२/कोवि/उमा/मूल्यांकन/१७
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
दिनांक – 13 NOV 2018

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर विभाग

२/- उपरोक्तप्रमाणे योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी. व जिल्हयातील मूल्यांकनाबाबतचे प्रस्ताव दि. २६/११/२०१८ पूर्वी या कार्यालयास सादर करावेत. यानंतर आलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक

25919 - 26

जा.क्र.उमा२/कोवि/मूल्यांकन/त्रुटी/१८
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
दिनांक — 13 NOV 2018

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

विषय- उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविदयालये मूल्यांकन २०१४-१५ प्रस्तावाबाबत

संदर्भ- १) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे यांचेकडील पत्र
क्र. उमा-२४३/मूल्यांकन/२०१८/१०४०१, दि.१२/११/२०१८
२) या कार्यालयाचे पत्र दिनांक २५/७/२०१८

वरील विषय संदर्भानुसार कळविणेत येते की, आपल्या जिल्हयातील उच्च माध्यमिक शाळा/क.म.वि. चे २०१४-१५ चे मूल्यांकन प्रस्ताव सादर करणेबाबत वेळोवेळी सूचना देणेत आलेल्या आहेत. संदर्भ क्र. २ नुसार मूल्यांकनाबाबतचे त्रुटी पूर्तता प्रस्ताव व नव्याने प्राप्त होणारे प्रस्ताव दिनांक १६/८/२०१८ पर्यंत सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. तसेच यापुढे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत असेही कळविणेत आलेले होते. दि. १८/८/२०१८ पर्यंत प्राप्त झालेले प्रस्ताव या कार्यालयाकडून दिनांक २०/८/२०१८ रोजी शिक्षण संचालनालयास प्रस्ताव सादर करणेत आलेले आहेत.

तथापि, आपणाकडून दिनांक २०/८/२०१८ नंतरही मूल्यांकनाबाबतचे प्रस्ताव सादर करणेत येत आहेत. तसेच जिल्हयाचे एकत्रित प्रस्ताव सादर न करता एकेक प्रस्ताव सादर करणेत येत आहेत.

याद्वारे आपणास सूचित करणेत येते की, आपल्या जिल्हयातील उच्च माध्यमिक शाळा मूल्यांकनाचे परिपूर्ण प्रस्ताव (शाळा मूल्यांकन समिती गुणांकन तक्ता, समिती इतिवृत्त, संच मान्यता २०१७-१८ अखेर, वैयक्तिक मान्यता प्रती, सहा. शि. उ.नि. यांचा तपासणी अहवाल, विहित नमुन्यातील प्रपत्रे, शि.अ. यांचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र इ. सह मूल्यांकन बुकलेट) या कार्यालयास दिनांक २६/११/२०१८ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करणेत यावेत. सदरचे प्रस्ताव दिनांक ३०/११/२०१८ रोजी शिक्षण संचालनालयास कोणत्याही परिस्थितीत सादर करावयाचे आहेत.

दिनांक २६/११/२०१८ नंतर प्राप्त झालेले प्रस्ताव शिक्षण संचालनालयास सादर केले जाणार नाहीत, या कार्यालयाकडून सदर प्रस्ताव आपणांकडे परत पाठविणेत येतील याची नोंद घ्यावी.

**वरील प्रमाणे परिपूर्ण माहितीची हार्ड कॉपी व सॉफट कॉपी दिनांक २६/११/२०१८ पूर्वी या कार्यालयास सादर करावी. अन्यथा सदरचे प्रस्ताव अमान्य करुन परत पाठविणेत येतील याची नोंद घ्यावी.**

(सुभाष चौगुले)
प्र. शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहितीसाठी सविनय सादर-
मा. आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे
मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे १
प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-
प्राचार्य/मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त संबंधित विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा/वर्ग/तुकडया, कोल्हापूर विभाग,
२/- उपरोक्तप्रमाणे आपल्या क.म.वि.चा ऑनलाईन मूल्यांकन प्रस्ताव शाळा मूल्यांकन समितीच्या अहवालासह दिनांक २६/११/२०१८ पर्यंत या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. तदनंतर आलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.